ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

# प्राचीन भारताचे परराष्ट्र धोरण: एक चिकित्सक अभ्यास

** डॉ. वाघमारे के. एस.,*

** इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.*

**सारांश:**

*प्राचीन भारताचे परराष्ट्र धोरण हे संरक्षण, विस्तार आणि शांतता या त्रिसूत्रीवर आधारित होते. थोडक्यात, प्राचीन भारतीय शासकांनी कठोर लष्करी उपाय (दंड) आणि शांततापूर्ण राजनैतिक उपाय (साम) यांचा योग्य वेळी उपयोग करून, राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे, परंतु नैतिकतेचाही विचार करणारे परिपूर्ण परराष्ट्र धोरण विकसित केले.*

*प्राचीन भारतीय परराष्ट्र धोरणात अहिंसा, शांतता, आणि परस्पर सहयोगाच्या तत्वाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. जसे की जैन आणि बौद्धधर्मांच्या तत्त्वांनी पंचशील या नीतिमत्तेला प्रोत्साहन दिलं, तसेच दुसऱ्या राष्ट्रांच्या अंतर्गत कार्यात हस्तक्षेप न करता फक्त शांततामय आणि न्याय्य जागतिक व्यवस्था प्रस्थापित करण्याचा विचार या तत्वामध्ये अंतर्भूत आहे. प्राचीन भारतीय परराष्ट्र धोरण हे व्यावहारिक वास्तववाद आणि नैतिक आदर्शवाद (अशोक) यांचे मिश्रण होते.*

*बौद्ध धर्मातील पंचशील (शांततापूर्ण सहअस्तित्वाचे पाच तत्वे) आणि अलिप्ततेचे धोरण या बरोबरच नैतिकता स्वायत्तता, शांतता आणि व्यावहारिक सहभागा इत्यादी या प्राचीन तत्त्वांचा कायमचा प्रभाव आधुनिक भारतीय परराष्ट्र धोरणावर कायम स्वरूपी आहे. एकंदरीतच प्राचीन भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप* ***वास्तववाद (Realistic)*** *आणि* ***आदर्शवाद (Idealistic)*** *यांचा समन्वय साधणारे होते.*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रास्ताविक:

भारतीय परराष्ट्र धोरणाची चौकट अत्यंत प्रभावी असून साम्राज्यवाद, वंशवाद, यांसारख्या युद्ध प्रवृत्तीला विरोध करण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय सुरक्षा, शांतता सहकार्य, व अहिंसा या तत्त्वांचा भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये कायमस्वरूपी समावेश व्हावा यासाठी नेहमीच प्रयत्न करते.भारताच्या समकालीन भारतीय परराष्ट्र धोरणाची चिकिस्तक मांडणी करत असतांना प्राचीन भारतामध्ये निर्माण झालेल्या काही समृद्ध विचारसरणीचा प्रभाव अजूनही भारताच्या समकालीन परराष्ट्र

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

धोरणावर दिसून येतो. भारताने नेहमीच जगातील इतर देशाच्या सार्वभौमत्वाचा व अखंडतेचा आदर करत इतर देशाशी आपले परराष्ट्रीय संबंध प्रस्थापित केलेले आहेत.

आधुनिक कालखंडात प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय समुदायाचा एक भाग असल्यामुळे इतर राज्यांशी आपले संबंध निश्चित करण्याच्या गरजेतून त्यास आपले परराष्ट्रीय धोरण ठरवावे लागते."धोरण' या शब्दातून पूर्व-नियोजनाचा अर्थ ध्वनित होतो; परंतु अंतर्गत क्षेत्रातील आर्थिक किंवा सामाजिक धोरणापेक्षा परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप वेगळे असते". एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या बाबतीत स्विकारलेले धोरण किंवा व्यवहार म्हणजे परराष्ट्र धोरण होय. परराष्ट्रीय धोरणाने राष्ट्रहिताचे संवर्धन केले पाहिजे, असे हेन्री मॉर्गेनटाउसारखे राज्यशास्त्रज्ञ सांगतात. तथापि एखाद्या देशाचे सर्व प्रकारचे हित परस्परपूरक, सुसंगत, सारखेच महत्त्वाचे असेल असेही नाही.

उदा., राष्ट्रहित म्हणजे राष्ट्रातील नेमक्या कोणत्या समूहांचे हित? कुठल्या वर्गाचे हित?त्यांचे हित नेमके कोणी व कसे ठरवावयाचे. साकल्याने राष्ट्राचे हित ठरविण्यासाठी या हितांची बेरीज कशी करणार व कोण करणार? कोणंते हित किती महत्त्वाचे हे ठरवावयाचे निकष कोणते? प्राचीन आणि मध्ययुगीन भारत आणि जगाच्या इतिहासाकडे वळून पाहताना त्या काळातील धोरण राष्ट्रहितास पोषक होते की नाही, हे कदाचित ठरविता येईल; परंतु वर्तमान काळात राज्यकर्त्या वर्गास ज्या गोष्टी राष्ट्रहिताच्या वाटतात, तेच राष्ट्रहित असे समीकरण बनले आहे हे वास्तव आपण नाकारू शकत नाही. परिणामतः राष्ट्रहिताची व्याख्या अशी आत्मनिष्ठ झाल्यामुळे परराष्ट्र धोरणाची मूलभूत चौकट आणि क्षितिजे विस्तारने आणि आपल्या परराष्ट्र धोरणाची चिकिस्ता करणे खूप महत्वाचे आहे.

**विषय विवेचन :**

प्रत्येका राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण हे तेथील राज्यकर्त्या वर्गाच्या मूल्यांचे आणि विचारप्रणालीचे प्रक्षेपण असते. आधुनिक कालखंडामध्ये या परराष्ट्रीय धोरणाचे वर्गीकरण लोकशाहीवादी, सर्वंकष सत्तावादी, उदारमदवादी, साम्यवादी, आक्रमणवादी किंवा साम्राज्यवादी असे करण्यात येते. या अर्थानेच इंग्लंडचे धोरण उदारमतवादी, तर दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानचे आणि सध्या चीनचे धोरण आक्रमणवादी आहे. सर्वसाधारण जनतेची परराष्ट्रीय धोरणाकडे बघण्याची व त्याचे आकलन करण्याची हीच दृष्टी आहे. "अमेरिकेसारख्या लोकशाहीवादी देशाने पाकिस्तानसारख्या हुकूमशाही राष्ट्राशी सख्य प्रस्थापित करणे, किंवा रशियासासारख्या एखाद्या साम्यवादी राष्ट्राने चीनसारख्या दुसऱ्या साम्यवादी राष्ट्राच्या विरोधात उभे राहणे, हे अतिशय विसंगत वाटते."[१] परिणामतः परराष्ट्रीय धोरणाकडे बघण्याचा हा धोपटमार्ग अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवतो.

"प्रत्येक राज्य आपणास इष्ट असलेले वर्तन इतर राज्यांनी करावे, यासाठी आपल्या मर्यादित प्रभावाचा विविध स्वरूपांत वापर करून त्या त्या राज्यातील राज्यकर्त्यांचे मनवळविते, यालाच स्थूलमानाने परराष्ट्रीय धोरण म्हणता येईल."[२] जगातील अनेक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

विद्वानांनी परराष्ट्र धोरणाच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. जॉन मॉडेलस्की यांच्या मते "परराष्ट्र धोरण म्हणजे राज्याच्या व्यवहाराची अशी विकसित पद्धती होय की, ज्याद्वारे एक राज्य दुसऱ्या राज्याला आपल्या इच्छेप्रमाणे व्यवहार करण्यास सांगते किंवा आपल्या व्यवहाराची जुळवणी आंतरराष्ट्रीय पद्धतीनुसार करून घेते."[३] तर, "फेलिक्स ग्रास परराष्ट्र धोरणा बाबतीत असे म्हणतात की, "एखाद्या राज्याशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी तयार केलेला निर्णय किंवा कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवण्यासाठी घेतलेला निर्णय म्हणजे परराष्ट्र धोरण होय."[४]

मूलतः परराष्ट्रीय धोरण हे अनेक अनियंत्रित घटकांवर अवलंबून असते आणि म्हणून आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणत्याही राज्यास कालबद्ध तसेच योजनाबद्ध असे आखीव धोरण ठरविणे शक्य नसते. या दृष्टीतून परराष्ट्रीय धोरणाची तुलना, "स्वयंचलित जहाजापेक्षा नौकानयनाशी करता येण्यासारखी आहे. ज्याप्रमाणे प्रवाह, वारा, भरती, ओहोटी इ. घटक लक्षात घेऊन इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी नाविक हा बाह्य परिस्थितीशी स्वतःस जुळवून घेतो, त्याप्रमाणे राज्यकर्त्यासही आपले ईप्सित साध्य करण्यासाठी, स्वतःच्या नियंत्रणाबाहेर असलेले अनेक घटक व वरचेवर घडणाऱ्या अकल्पित घटना लक्षात घेऊन आपल्या धोरणाची दिशा व डावपेच ठरवावे लागतात".[५]

राष्ट्राची भौगोलिक रचना, राष्ट्राची लोकसंख्या, राष्ट्रातील निसर्गसंपत्ती आणि संसाधने , शिवाय औद्योगिक विकास, व राजकीय नेतृत्व, यांबरोबरच ऐतिहासिक परंपरा, विचारप्रणाली, राजकीय व्यवस्था, लष्करी सामर्थ्य हे सर्व देशांतर्गत घटक आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील घटक उदा. आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांसारख्या संघटना, आपले शत्रू-मित्र आणि त्यांचे बलाबल या सर्व घटकांचे मूल्यमापन करून मगच परराष्ट्रीय धोरण ठरते. वस्तुतः भारताच्या प्राचीन कालखंडाचे परराष्ट्रीय धोरण या निकषांचे जरी पुर्वगामी नसले तरी यातील बहुसंख्य घटक आपल्याला भारताच्या प्राचीन इतिहासामध्ये दिसून येतात.

**भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा विकास प्राचीन कालखंड:**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा ऐतिहासिक विकास हा मुख्यतःतीन प्रमुख टप्प्यांमध्ये विभागला जाऊ शकतो प्राचीन कालखंड,वसाहतिक कालखंड आणि स्वातंत्र्यानंतरचा कालखंड मात्र जेंव्हा आपण प्राचीन भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार करतो तेंव्हा हा विकास अनेक टप्प्यांमध्ये घडला असून तो देशाच्या भूगोल, संस्कृती, धार्मिक विचारधारा, आणि आंतरराष्ट्रीय संदर्भानुसार बदलत गेलेला आहे याची जाणीव आपणाला प्राचीन भारताच्या इतिहासाचे सूक्ष्म अवलोकन करताना होते. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात या ग्रंथामध्ये राजाने अंगीकारावयाच्या परराष्ट्रीय धोरणाबाबत अतिशय सारगर्भित चिकित्सा केली आहे. जी आपल्याला प्राचीन भारताच्या संक्रमणकालीन जीवनाच्या स्थिरीकरणाची व्यापकपणे जाणीव करून देते.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

"प्राचीन भारतातील परराष्ट्र धोरण हे संरक्षण आणि साम्राज्यविस्तार यावर आधारित होते. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये परराष्ट्र धोरणाचे मूलभूत सिद्धांत मांडले आहेत, जे वास्तववादावर (Realism)आधारित होते. शिवाय मंडल सिद्धांत यात एका राजाला केंद्रस्थानी मानून शेजारील राज्यांचे नैसर्गिक शत्रू आणि मित्र म्हणून वर्गीकरण केले आहे, जे भू-राजकीय (geopolitical) संबंधांवर आधारित असल्याचे निर्देशित करते."[६] यावरून तत्कालीन शासकांच्या सामरिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हितांची देखभाल करत या परराष्ट्र धोरणाला गतिशीलता प्राप्त झालेली आहे हे आपण कदापीही नाकारू शकत नाही.

प्राचीन भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची उद्दिष्टे आणि ती साध्य करण्यासाठी जे मार्ग अवलंबवले जात, त्यांतील राजनय हा पुरातन काळापासून वापरलेला मार्ग आहे. पूर्वी आणि आजही विविध प्रकारच्या राजदूतांकरवी बोलणी वा वाटाघाटी केल्या जातात. "प्राचीन भारतातील साहित्यात या राजनयाचे अनेक उल्लेख लिखित आणि अलिखित उल्लेख आढळून येतात. "दूत (Ambassadors): प्राचीन काळात दूत हे दोन राज्यांमध्ये संदेशवहनाचे आणि राजनैतिक संबंधांचे अत्यंत महत्त्वाचे माध्यम होते. हे दूत केवळ संदेशवाहक नसून, ते राज्याच्या प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जात."[७] प्राचीन काळात आंतरराष्ट्रीय संबंधांना राजाची नीती किंवा राजधर्म (Duty of the King) याचा एक अविभाज्य भाग मानले जात असे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील ही राजदूतांची भूमिका आणि मार्गदर्शन यांचे उल्लेख आहेत, जे प्राचीन काळातील परराष्ट्र धोरणाच्या तत्त्वज्ञानाचं मुख्य वैशिष्ट्य मानले जाते.

कौटिल्यानी राज्यविस्तारासाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या पुढील सहा धोरणांची चर्चा केलेली आहे, "(१) संधी (स्नेहसंबंध), (२) विग्रह (संघर्ष), (३) आसन (तटस्थता), (४) यान (आक्रमण), (५) संश्रय (पराश्रय), (६) द्वैधिभाव (काही राज्यांशी युद्ध, तर काहींशी तह)". या बरोबरच सप्तांग सिद्धांत: राज्याचे सात घटक (स्वामी, अमात्य, जनपद, दुर्गा, कोश, दंड, मित्र)"[८] शिवाय "मंडल सिद्धांत (Circle of States Theory): कौटिल्याने राजाचे राज्य केंद्रस्थानी मानून त्याच्या शेजारील आणि त्यापुढील राज्यांचे वर्णन केले आहे. शत्रू (अरी), मित्र आणि तटस्थ राज्यांचे वर्तुळ तयार करून, राष्ट्रीय हित जपण्यासाठी कोणत्या राजाशी कसे संबंध ठेवावेत याचे तपशीलवार विश्लेषण या सिद्धांतात आहे. 'शत्रूचा शत्रू आपला मित्र' (Friend of the enemy is an enemy) हे तत्त्व यात महत्त्वाचे आहे."

गौतम बुद्धांनी सांगितलेले बौद्ध तत्त्वज्ञान अहिंसा, शांतता, परस्पर सहकार्य, दया आणि करुणा ही तत्त्वे भारतीय परराष्ट्र धोरणावर कायमस्वरूपी प्रभाव टाकणारी ठरली आहेत. "सम्राट अशोकाने मौर्य काळात आपल्या विशाल साम्राज्यात बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी विविध देशांमध्ये उदा. श्रीलंका, आग्नेय आशिया राजदूत पाठवून शांततापूर्ण मैत्रीपूर्ण परराष्ट्रीय

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

धोरणाचे खूप मुत्सद्देगिरीचे उदाहरण घालून दिले."[९] परिणामतः बौद्ध धर्मामुळे भारताच्या धोरणांना नैतिकता, शांततावाद (Pacifism) आणि सांस्कृतिक राजनैतिकतेचा (Cultural Diplomacy) आधार मिळाला.

"भारतातील वैदिक धर्म, जैन धर्म, व अन्य पंथत्यातील विचारधारा व तत्वज्ञ यांनी प्राचीन काळातील तत्वज्ञान यांनी सहिष्णुतेबरोबर सत्य, अहिंसा, भूतदया इ. तत्त्वांचा पुरस्कार केला."[१०] नेहमीच प्राचीन भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची चर्चा करताना त्यात मुख्यतः मैत्री, सहकार्य, शांतता, अहिंसा आणि परस्पर सन्मान यांचा महत्त्वाचा भाग असल्याचं दिसून येते त्याची पायाभूत वैचारिक चौकट ही वरील विचारसरणीत आहे. भारताच्या ऐतिहासिक कालखंडाचे विश्लेषण करत असतांना मौर्य, गुप्त किंवा चोल राजवंशाच्या परराष्ट्र धोरणाची चिकित्सक तपासणी केल्यानंतर प्राचीन भारतातील परराष्ट्र धोरणाचा अभ्यास आजही अगदी महत्वपूर्ण असून भारताच्या भविष्याकडे पाहण्यासाठी तो किती महत्वाचा आहे याची अनुभूती येते.

**प्राचीन भारतीय परराष्ट्र धोरणाचे स्वरूप:**

प्राचीन भारतीय परराष्ट्र धोरणाचे स्वरूप प्रामुख्याने खालील चार प्रमुख बाबींवर केंद्रित असल्याचे दिसून येते.

**१.व्यापारी संबंध:** "सिंधू संस्कृतीच्या काळापासून (उदा. ओमान, मेसोपोटेमिया) रोमन साम्राज्य, चीन, इराण आणि आग्नेय आशियाई देशांशी रेशमी कापड, मसाल्याचे पदार्थ, मौल्यवान रत्ने यांचा मोठा व्यापार चालत असे. या व्यापारी मार्गांचे (Trade Routes) संरक्षण करणे हे या परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते."[११] भारताचे प्राचीन काळातील रोमन साम्राज्य, इजिप्त, चीन आणि आग्नेय आशियाशी व्यापक व्यापार संबंध लक्षात घेता अंतर्गत व बाह्य व्यापारी संबंधामुळे व्यापारी आणि सागरी व्यापारी भूमिका आणि धोरणांमुळे परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप उत्तरोत्तर विकसित होत गेले. चोल राजवटीने आग्नेय आशियातील सागरी व्यापाराच्या आणि प्रभावाचा माध्यमातून प्रामुख्याने परराष्ट्र धोरण या काळात राबवण्यात पुढाकार घेतला.

**२.सांस्कृतिक देवाणघेवाण:** बौद्ध आणि हिंदू धर्म व तत्त्वज्ञान याचा प्रसार आग्नेय आशिया, चीन आणि तिबेटमध्ये मोठ्या प्रमाणावर झाला. "भारताचा सांस्कृतिक वारसा (Cultural Heritage) हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे घटक होते. सांस्कृतिक आणि धार्मिक प्रसार: बौद्ध धर्मप्रसारासाठी सम्राट अशोकाने बौद्ध मिशनऱ्यांना त्यांचा मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले."[१२] परिणामतः प्राचीन भारतीय परराष्ट्र धोरणाची क्षितिजे विस्तारली.

**३. भारताचे भौगोलिक स्थान व विस्तार:** हिमालय आणि तिन्ही बाजूंना असलेला समुद्रकिनारा यांमुळे वायव्येकडील आक्रमणे वगळता इतर क्षेत्रांत संरक्षणाचे धोरण अधिक सोपे झाले.

**४. युद्ध नीती:**प्राचीन भारतामध्ये जरी शांततेला महत्त्व दिले जात असले , तरीही राज्याच्या सीमांचे आणि राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी युद्ध हा परराष्ट्र नीतीचा एक भाग मानले जात असे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

**निष्कर्ष:**

१. **वास्तववाद आणि नीतिमत्तेचा समन्वय:** "प्राचीन भारताचे परराष्ट्र धोरण हे पूर्णपणे वास्तववादी नव्हते आणि पूर्णपणे आदर्शवादी ही नव्हते. ते वास्तववाद आणि आदर्शवाद या दोहोंमध्ये व्यावहारिक संतुलन आणि समन्वय यांची सांगड घालणारे होते."[१३] उदा.कौटिल्याचे शक्ती-संतुलनाचे तत्व (Balance of Power) आणि राष्ट्रीय हित यावर आधारित वास्तववादी नियमांचा सम्मुचय तर याउलट, सम्राट अशोकाने धम्म-विजयाचे धोरण आणि त्यातून विकसित होणारी नैतिकता आणि शांतता या मूल्यांना आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये केंद्रस्थान दिले.

२. **भू-राजकीय विचारसरणीचे वर्चस्व:** राष्ट्राचा भूगोल आणि शेजारील राष्ट्रे हे धोरणाचे सर्वात महत्त्वाचे निर्धारक घटक होते.उदा. कौटिल्याचा मंडल सिद्धांत स्पष्टपणे सांगतो की, जवळचा शेजारी (immediate neighbour) हा नैसर्गिक असतो. या सिद्धांतामुळे कोणत्याही परराष्ट्र धोरणाला सुरुवात करण्यापूर्वी भौगोलिक परिस्थितीचे आकलन करणे महत्वपूर्ण ठरते .

३. **राजनैतिकता आणि गुप्तहेरगिरीचे संस्थात्मक स्वरूप:** परराष्ट्रीय धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी राजदूतांचे आणि गुप्तहेर यंत्रणेचे (Spy Network) एक महत्त्वपूर्ण जाळे असावे लागते हे प्राचीन भारतातील उदयोन्मुख राजकीय व्यवस्था व शासन संस्थानी ओळखले होते आणि त्यांना संस्थात्मक स्वरूप दिले. दूत हे केवळ संदेशवाहक नसून, ते वार्ताहर (Envoys), गुप्तहेर आणि संधि-विग्रह (शांतता-युद्ध) यांसारख्या धोरणांचे तज्ज्ञ मानले जात होते. यामुळे परराष्ट्र धोरणात अशा माहितीचे महत्त्व अधोरेखित होते.

४. **आर्थिक आणि व्यापारी उद्दिष्टे:** व्यापार मार्ग सुरक्षित ठेवणे आणि राज्याचा खजिना (कोष) वाढवणे हे लष्करी आणि राजनैतिक प्रयत्नांमागील एक महत्त्वाचे वास्तववादी उद्दिष्ट होते. उदा. चोल साम्राज्याने आपल्या शक्तशाली नौदलाच्या मदतीने आग्नेय आशियाई देशांशी (Southeast Asia) संबंध दृढ केले. त्यांचा उद्देश केवळ राजकीय प्रभाव नसून, समुद्री व्यापार (Maritime Trade) मार्ग सुरक्षित ठेवून आर्थिक हितसंबंध साधणे हा होता.त्यासाठी लागणारी राजकीय विचारसरणी ही प्राचीन भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा संस्थात्मक पाया म्हणून समोर आली.

५. **सांस्कृतिक राजनैतिकतेचा प्रभाव:** धर्म आणि संस्कृतीचा उपयोग लष्करी शक्तीच्या (Hard Power) पर्यायी किंवा पूरक साधन म्हणून केला जात होता.उदा. अशोकाने बौद्ध धर्माचा प्रसार करून अनेक परकीय राष्ट्रांशी सांस्कृतिक आणि शांततापूर्ण संबंध प्रस्थापित केले. यामुळे, भारताचा प्रभाव सैन्याच्या बळाऐवजी नैतिक आणि वैचारिक आधारावर दूरदूरपर्यंत पोहोचला.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

**संदर्भ :**

1. मुखर्जी अमित्ताव जे. बंधोपाध्याय, इंटरनॅशनल रिलेशन्स थेअरी. फ्रॉम अनार्की टू वर्ल्ड गव्हर्नमेंट मॅन्यूस्फिस्ट इंडिया २००१, पृष्ठ २७
2. मिश्रा के. पी. (एड) स्टडिझ इन इंडियाझ फॉरेन पॉलिसी, विकास पब्लिकेशन्स १९६९. नवी दिल्ली. पृष्ठ २७
3. चंद्रा, बिपीन अँड आदर्स इंडिया सायन्स इंडिपेन्डन्स् पेंग्विन बुक्स, २००७, नवी दिल्ली. पृष्ठ २७
4. Charles O. Lerche Jr. and Abdul A Said, Concepts of International Politics, (Engelwood Cliffs, 1963), Page 9
5. James N. Rosenau, in Thompson and Boyd, (Eds), World Politics: An Introduction, Page. 23
6. Bandyopadhyaya, J. The Making of India's Foreign Policy, Allied Publishers Pvt Ltd, 2003, New Delhi Page 37
7. खन्ना व्हि. एन. फॉरेन पॉलिसी ऑफ इंडिया, विकास पब्लिशिंग प्रा. लिमिटेड, २०१०, नवी दिल्ली. पृष्ठ २७
8. मिश्रा के. पी. (एड) स्टडिझ इन इंडियाझ फॉरेन पॉलिसी, विकास पब्लिकेशन्स १९६९. नवी दिल्ली. पृष्ठ १०९
9. मॅटो अमिताभ अँड हॅपीमन जॅकोब, शेपींग इंडियाझ फॉरेन पॉलिसी, द्वार आनंद पब्लिकेशन्स २०१०.पृष्ठ ९३
10. दिक्षित जे. एन. इंडियाझ फॉरेन पॉलिसी, पीक्स बुक्स् २००३ नवी दिल्ली. पृष्ठ ८७
11. Basham, A.L. (1967) The Wonder that was India. Rupa publication, New Delhi: Page.273
12. Dev Prabhakar Raghunath - Ancient India', Vidya publication, Nagpur 1990 Page.139
13. Gaydhani R.N., Rahurkar R.N. - 'Cultural history of Ancient India Continental publication Pune, 1955 Page. 329

*Cite This Article:*

**डॉ. वाघमारे के. एस. (2025).** प्राचीन भारताचे परराष्ट्र धोरण: एक चिकित्सक अभ्यास. **In Educreator Research Journal: Vol. XII (Issue VI),** pp. 213–218. **Doi:** https://doi.org/10.5281/zenodo.18398311